**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ५३ (१) अंतर्गत सूचना**

क्र. एसआरओटी/भिपअक्षे/२५०६/अबां/ज.या.क्र.१३९-२०१३/ मौ. घोलगाव -१६२/२५२२ (रजि.नं.२/३) /२०२०.

प्रति,
**श्री. सतिश अग्रवाल, श्री. अशोक अग्रवाल (जमीन मालक/ इमारत मालक)**
**Eskay Silk Industries Put.Ltd. (भाडेकरु/कब्जेदार)**
**स.नं. -३७,३८, घर नं. १७४४,**
**Eskay Silk Industries Pvt.Ltd, राज राजेश्वरी कंम्पाऊड,**
**मौ.घोलगाव, ता. भिवंडी, जि.ठाणे.**

ज्याअर्थी खालील सही करणारा अधिकारी यांची मा. महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, मुंबई यांनी अधिसूचना क्र. टिसीपी (पी २)/संकिर्ण/सामान्य /४७ /१५३०/ २०१५, दि. २९/१०/२०१५ अन्वये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या अंतर्गत भिवंडी परिसर अधिसुचित क्षेत्राच्या विशेष नियोजन प्राधिकरणासाठी उक्त अधिनियमाच्या कलम ५३ अंतर्गत नियोजन प्राधिकरणाच्या अधिकाराचा व कार्याचा वापर करण्याच्या प्रयोजनासाठी पदनिर्देशित अधिकारी म्हणून नियुक्त केले आहे.

आणि ज्या अर्थी मला कळविण्यात आले आहे की, खालील सूचीत वर्णन केल्याप्रमाणे जमिनीवर उक्त अधिनियमांतर्गत आवश्यक असलेल्या परवानगीशिवाय आपण विकास आरंभ केला किंवा विकास करण्यात आला अथवा जमिनीच्या वापरात बदल केला आहे –

सबब, याद्वारे आपल्याला कळविण्यात येते की, सदर नोटीस आपणांस प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसाच्या आत –

१. सदर करण्यात आलेल्या बांधकाम / विकासाबाबतचे प्राधिकृत प्राधिकरणाच्या परवानगीचे / मंजुरीबाबत प्राप्त प्रमाणपत्राची प्रमाणित प्रत सादर करावी.

२. जर सदर करण्यात आलेल्या बांधकामाबाबत कोणतीही परवानगी घेण्यात आली नसेल तर आपण त्वरीत सदर बांधकाम निष्कासित करावे व सदर जमीन पुर्वस्थितीत म्हणजे सदर जमिनीवरील बांधकाम करण्यापुर्वीच्या स्थितीमध्ये आणावे.

उक्त अधिनियमाच्या कलम ५३ (३) अन्वये सदर नोटीसीमुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तिस नोटिसीत विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या कालावधीत, विहित करण्यात आलेल्या रितीने ज्या संबंधात नोटीस देण्यात आली असेल, अशी त्या जमिनीवरील कोणतीही इमारत किंवा बांधकामे तशीच ठेवण्याबाबत किंवा असा जमिनीचा कोणताही वापर चालू ठेवण्याबाबत, कलम ४४ अन्वये परवानगी मिळण्यासाठी अर्ज करता येईल, आणि या अर्जाचा अंतिम निर्णय लागेपर्यंत, किंवा तो मागे घेण्यात येईपर्यंत, इमारती किंवा बांधकामे तशीच चालु ठेवण्यास किंवा जमिनीचा वापर चालु ठेवण्यास केवळ नोटिसीमुळे बाधा येणार नाही.

उक्त अधिनियमाच्या कलम ५३ (५) अन्वये ज्या परवानगीसाठी अर्ज करण्यात आला असेल, ती परवानगी देण्यात आल्यास नोटीस मागे घेण्यात आली असल्याचे मानण्यात येईल, परंतु ज्या परवानगीसाठी अर्ज करण्यात आला असेल, अशी परवानगी देण्यात न आल्यास, नोटीस लागू असल्याचे समजण्यात येईल.

उक्त अधिनियमाच्या कलम ५३ (६) (अ) अन्वये सदर सूचनेमध्ये निर्दिष्ट केलेल्या कालावधीत ३० दिवसाच्या आत अनुपालन न केल्यास आपल्यावर खटला भरण्यात येईल, तसेच उक्त कालावधी संपल्यानंतर

कोणत्याही वेळी उक्त अधिनियमाच्या कलम ५३ (६) (अ) अन्वये खालील सुचित वर्णन केल्याप्रमाणे जमिनीवरील बांधकाम/विकास निष्कासित करण्याबाबत किंवा त्यात फेरफार करण्याबाबत, विकास केला जाण्यापुर्वी जमीन ज्या स्थितीत होती, त्या स्थितीत ती परत आणण्याकरीता बांधकाम/विकास निष्कासित करण्याची कारवाई प्राधिकरणामार्फत करण्यात येईल व प्राधिकरणास आलेल्या कोणत्याही खर्चाची रक्कम आपणाकडून जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे वसूल केली जाईल. याची कृपया नोंद घ्यावी व याकरीता वेगळयाने कोणतीही नोटीस देण्यात येणार नाही व आपल्या संभाव्य मालमत्ता व इतर नुकसानीस प्राधिकरण जबाबदार राहणार नाही व आपल्याविरुद्ध कायदेशीर कारवाई ही आपल्या जोखीम/जबाबदारीवर व आपल्या खर्चाने करण्यात येईल.

## सूची

(अनधिकृत बांधकाम/विकासासह सदर मालमत्तेची माहिती)

| गाव/तालुका/जिल्हा | सर्व्हे नंबर | बांधकामाचा प्रकार | बांधकामाचे स्वरुप/तपशील |
|---|---|---|---|
| मौ. घोलगाव, ता. भिवंडी, जि. ठाणे | स.नं. ३७,३८ | आर सी सी पध्दतीचे बांधकाम व वर पत्रा शेड | तळमजला+२ (सोबत जोडलेल्या इमारतीचे छायाचित्र व गुगल अर्थ छायाचित्रावर दर्शविल्यानुसार ) |

दिनांक :- 15 JUL 2020

सही :-
नाव :- नेहा कुवळेकर
पदनाम :- (अ.का.) नियोजक

**सोबत:-**

१. बांधकाम निरिक्षण अहवाल दिनांक २९/०१/२०२०.
२. सदर इमारतीचे/विकासाचे स्थळ/ठिकाण दर्शविणारा गुगल अर्थ छायाचित्र.
३. सदर इमारतीचे/विकासाचे छायाचित्र.

**प्रत** :- (माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी.)

१. सह महानगर आयुक्त, भूमी व मिळकत शाखा.
२. पोलीस अधिक्षक, ठाणे ग्रामीण, कोर्ट नाका, पोलीस शाळेसमोर, ठाणे (प), जि. ठाणे पिन कोड - ४०० ६०१.
३. वरिष्ठ पोलीस निरिक्षक, भिवंडी तालुका, भिवंडी तालुका पोलीस स्टेशन (ग्रामीण), जुना जकात नाका, तहसिलदार ऑफिसजवळ, भिवंडी
४. वरिष्ठ पोलीस निरिक्षक, भिवंडी तालुका पोलीस ठाणे यांना देऊन विनंती करण्यात येते की, आपले अधिनिस्त असलेले पोलीस पाटील यांच्यामार्फत नोटीस तामील करण्याची कार्यवाही करावी.
५. पोलीस पाटील, घोलगाव ग्रामपंचायत, घोलगाव, ता. भिवंडी, जि. ठाणे यांना नोटीस तामीलीस्तव.